# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०५/२०२५ (सोमवार)**

---

## चारचाकी वाहन चोरी करणारे ३ आरोपी नरखेड पोलीसांच्या ताब्यात ९ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त , २ गुन्हे उघड

**पोलीस स्टेशन नरखेड** :— पोलीस स्टेशन नरखेड येथे अप क्र. ३००/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. आणि अप. क्र. ३०६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. सं. असे दोन वाहन चोरीचे गुन्हें नोंद असुन नरखेड पोलीसांनी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा कसोशीने शोध घेवुन आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी आरोपी नामे **१) निखील चंद्रशेखर सावरकर , वय २६ वर्ष रा. दावसा ता. नरखेड २) राहूल प्रदिप कळंबे, वय २१ वर्ष रा. भिष्णुर ता. नरखेड ३) तुषार किशोर ठाकरे, वय २५ वर्ष रा. भिष्णूर ता. नरखेड** यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयासंबधाने कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी संगनमत करून अप. क्र. ३०६/२०२५ मध्ये राजनी शिवारातून एक जॉनडीयर कंपनीचा हिरव्या रंगाचा ५०४५ डी ट्रॅक्टर कीमती ८,००,००० /—रूपये व अँग्रोवन कंपनीचे एक रोटावेटर कीमती ७५,००० रूपये असा एकूण ८,७५,००० /—रू चा मुद्देमाल चोरून नेल्याची माहीती दिली. तसेच अप. क्र. ३००/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. सं. गून्हयामध्ये सावरगाव ,नरखेड येथुन एक टाटा एस चारचाकी वाहन क्र. एम.एच ४० एन ५७२३ किंमती ८०,०००/— रुपये हे चोरून नेल्याची माहीती दिल्याने नमुद आरोपीतांकडून **पंचासमक्ष एक जॉनडीयर कंपनीचा हिरव्या रंगाचा ५०४५ डी ट्रॅंक्टर किंमती ८,००,०००/— रूपये व अँग्रोवन कंपनीचे एक रोटावेटर कींमती ७५,०००/— रूपये व एक टाटा एस चारचाकी वाहन क्र. एम.एच.४० एन**

५७२३ कीमती ८०,०००/—रू. असा  एकूण ९,५५,०००/—रू चा मूद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

सदर आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास नरखेड पोलीस करीत आहेत.



# फोनद्वारे क्रिकेट सट्टा / बेटिंग लावुन जुगार खेळविणाऱ्यांवर गुन्हा नोंद
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई
# ३ आरोपी अटक

काल दिनांक ०४/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती प्राप्त झाली की, **खापरखेडा दहेगाव रंगारी येथे राहणारा शंशांक पप्पु शाहु, रा. वार्ड क्र ०५, दहेगाव रंगारी, खापरखेडा हा आपले राहते घरी भारतात सुरू असलेल्या आय.पी.एल.च्या क्रिकेट मॅंचेस मधील लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध पंजाब किंग्ज सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोनद्वारे लोकांकडुन पैशाची खायवाडी करून क्रिकेटचे खेळावर पैशाचे हारजितचा जुगार खेळत व खेळवित आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर पथकाने नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकली असता **१) शशांक पप्पू शाहू ,वय २३ रा.२) साईल पप्पू शाहू वय २१ वर्ष दोन्ही राहणार दहेगाव रंगारी,३) मनीष प्रल्हाद टेंभुने, वय २७ वर्ष राहणार टेका नाका नागपूर हे स्वतःचे आर्थीक फायदयाकरिता पैशाचे हारजीतवर क्रिकेट बेटींग जुगार खेळत व खेळवित असताना व पैशाची खायवाडी करीत असताना पंचांसमक्ष मिळून आले. मिळुन आलेल्या तीन्ही ईसमापैकी नामे शशांक पप्पु शाहु रा. खापरखेडा यास अधीक विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, आरोपी क्रं ४) नामे प्रीतम उर्फ बादल राउत रा. गीट्टीखदान नागपुर याचे सांगण्यावरून क्रिकेट सामन्याची खायवड करतो व संपुर्ण खायवड आरोपी क्रं ५) ओमप्रकाश जुगलकिशोर शाहू रा. कळमना नागपूर आणि आरोपी क्रं ६) रवि टिकले रा.नागपूर याच्या दोंघा कडे त्यांच्या मोबाईल क्रमांकावर पाठवित असल्याचे सांगीतले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १) २ टॅब ,२) ५ अँड्रॉइड मोबाइल ,३) ५ कीपॅड मोबाइल, ४) हायर कंपनीची टीव्ही व इतर साहित्य असा एकूण १,२९,५६०/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**वर नमुद ६ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ४,५ मजूका सहकलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. १) शशांक पप्पू शाहू वय २३ रा.२) साईल पप्पू शाहू वय २१ वर्ष दोन्ही राहणार दहेगाव रंगारी,३) मनीष प्रल्हाद टेंभुने वय २७ वर्ष राहणार टेका नाका नागपूर यांना अटक करण्यात आली आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १५ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त रामटेक पोलीसांची कामगिरी १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०४/०५/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी राष्ट्रीय महामार्ग ४४ कांद्री रामटेक येथे नाकाबंदी केली असता एक टिप्पर क्रमांक एम.एच—४०—सी.टी—६७१८ हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता चालकाने त्याचे **नाव अजय रामप्रसाद सोनवणे वय २८ वर्ष रा. प्लॉट नं ६८ , काटेकर किराणा स्टोर जवळ ,धरमनगर पारडी ,भांडेवाडी नागपुर असे असल्याचे सांगितले. सदर वाहन चालकाला रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे त्याने सांगितले. सदर चालक टिप्परमध्ये टिप्पर मालक राहुल अशोक स्वामी वय ३३ वर्ष रा.प्लॉट नं २०२ पटेल टॉवर बेसा ,सिताबाई घाट समोर नागपुर याचे सांगणेवरून टिप्परमध्ये अवैधरित्या रेती भरून नेत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली**.पोलीसांनी पंचासमक्ष **१) टिप्पर क्रमांक एम.एच—४०—सीटी—६७१८ किंमती १५,००,००० /— रूपये, २) ८ ब्रास रेती किंमती ४८,००० /— रूपये असा एकुण १५,४८,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक आणि वाहन मालक यांच्या आरोपीतांविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता, सहकलम ४,२१. खान खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने